आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता
१९ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना लवकरच युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळणार असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडून व्यक्त, किल्ल्यांवरचे अतिक्रमण हटवण्याचीही घोषणा

- देश - विदेशात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

- राज्यातल्या आरोग्य यंत्रणेत २ हजारांहून अधिक पदांच्या निर्मितीला सरकारची मान्यता

- पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान मराठी साहित्ययात्री संमेलनाला सुरुवात

**आणि**

- रणजी करंडकाच्या उपांत्य फेरीत विदर्भाची मुंबईवर २६० धावांची आघाडी

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नामांकित केले आहेत, त्यांना लवकरच मंजुरी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्ताने पुण्यात आज जय शिवाजी जय भारत पदयात्रेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शिवरायांची जयंती फक्त भारतातच नाही तर २० देशांमध्ये साजरी केली जाते. त्यांचं प्रशासन, कल्याणकारी धोरणं, संरक्षण आणि नौदलाचं व्यवस्थापन, दूरदर्शी नेतृत्व हे अतुलनीय असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड - देवेंद्र फडनवीस**

छत्रपती शिवाजी महाराजांनी एका मजबूत आणि स्वयंपूर्ण राष्ट्राची कल्पना केली होती, त्याचप्रमाणे आजच्या तरुणांनी नवोन्मेष, सामाजिक सौहार्द आणि समावेशक विकासासाठी काम केलं पाहिजे असं केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय म्हणाले. राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात ‘जय शिवाजी - जय भारत’ पदयात्रे आयोजित करण्यात आली होती. उच्च पदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि युवावर्ग मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषा या त्रिसूत्रीवर आधारित शिवसृष्टीचं दालन प्रेरणादायी असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. पुण्यात आंबेगाव इथे शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पण करताना ते बोलत होते. या टप्प्याचं काम वेगाने व्हावं यासाठी राज्य शासनाकडून आणखी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली.

शिवजयंतीच औचित्य साधून राज्यातले शिवकालीन तलाव, बंधारे, गावतळी आणि पाणीपुरवठा करणारे तलाव यामधला गाळ काढण्याच्या मोहिमेचा आज प्रारंभ करण्यात आला. राज्याचे मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते यवतमाळ किटा कापरा इथून या मोहिमेला सुरुवात झाली. याअंतर्गत १ हजार तलावातला गाळ काढण्याचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराज यांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे. राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी मुंबईत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांवरची अतिक्रमणे हटवण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आज केली. शिवनेरी किल्ल्यावर आयोजित जयंती समारंभात ते बोलत होते. किल्ल्यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी कृती दलाचीही स्थापना केल्याचं ते म्हणाले.  यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ वी जयंतीनिमित्त विविध ठिकाणी भव्य मिरवणुका, शोभायात्रा, व्याख्यानं, चित्र आणि शस्त्र प्रदर्शनं इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मिरवणुका आणि पदयात्रांमधे शिवकाळ साकारणाऱ्या वेशभूषा तसंच कसरत करतब दाखवणाऱ्या कवायती लक्ष वेधून घेत आहेत. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड व्हीसी**

*संसद भवन परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास विविध मान्यवरांसह शिवप्रेमींकडून अभिवादन करण्यात आलं. नवीदिल्लीत*

*महाराष्ट्र सदनात शिवजयंती सोहळा झाला. भारतीय लष्करानं यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांना प्रथमच विशेष मानवंदना* ***दिली. सातार्‍यात*** *किल्ले अजिंक्यतारा परिसर काल रात्री हजारो मशालींनी उजळवून टाकण्यात आला होता. शिवजयंतीच औचित्य साधून मालवण-राजकोट इथं उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पायाभरणी पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झालं. जगाला हेवा वाटेल असा छत्रपती शिवरायांचा पुतळा या ठिकाणी उभा राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. हा ६० फुटी तलवारधारी पुतळा ब्रॉन्झ धातूचा असेल. पुतळा उभारण्यासाठी आणि आजूबाजूला शिवसृष्टी उभारण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही राणे यांनी दिली.*

***वाशिम*** *शहरात छत्रपती शिवाजी महाराज व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने शिवकालीन युद्ध कलांचं प्रदर्शन करण्यात आलं. गोंदिया जिल्ह्यात शिवरायांच्या १४ फूट उंच मूर्तीला अभिषेक करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केलं.* ***हिंगोली*** *जिल्ह्यात जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.* ***धुळे*** *जिल्ह्यात आज शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आलं.* ***सोलापुरात*** *काल चार जणांनी हुतात्मा पुतळ्या समोर सलग १९ तास १९ मिनिटे, १९ सेकंद दांडपट्टा फिरवून शिवरायांना अभिवादन केलं.* ***परभणीत*** *पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. पोलिस दलातील सुसज्ज यंत्रणेतील वाहने, शस्त्र, पोलिस अधिकारी, कर्मचारी यात सहभागी झाले होते.*

**<><><><><>**

अमेरिकेत न्यूयॉर्कमध्येही छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अमेरिकेच्या विविध राज्यातून आलेले नागरिक

यात सहभागी झाले होते. याविषयी सांगली जिल्ह्यातल्या शिराळ्याचे मूळ रहिवासी आणि सध्या अमेरिकेत कार्यरत असलेले डॉ. युनूस आत्तार आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**होल्ड अमेरिका - युनूस आत्तार**

**<><><><><>**

राज्य सरकारनं विविध ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय स्थापन करायला मान्यता दिली आहे. त्यासाठी उपकेंद्र ते जिल्हा रुग्णालय स्तरावर एकूण २ हजार ७० पदनिर्मितीसाठी शासनानं मान्यता दिली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे. टप्याटप्यानं सर्व रिक्त जागा भरण्यासाठी नियोजनात्मकरित्या प्रयत्न केले जातील, असं आबीटकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्तानं पहिल्यांदाच पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान ‘मराठी साहित्ययात्री संमेलन’ आयोजित केलं आहे. या विशेष रेल्वेला महादजी शिंदे यांचं नाव दिलं आहे, तर रेल्वे बोग्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांची नावं दिली आहेत.

या संमेलनाचा प्रारंभ आज पुणे रेल्वे स्थानकावर झाला. मराठी साहित्ययात्री संमेलनाचे अध्यक्ष शरद तांदळे, कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ, आदी मान्यवर उपस्थित होते . ‘गर्जा महाराष्ट्र माझा’ या महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनानंतर पुण्यातून रेल्वे निघाली. तत्पूर्वी पुस्तक दिंडीही काढली होती. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी देखील या विशेष रेल्वेद्वारे साहित्यिकांसोबत प्रवास केला.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरू असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात विदर्भानं दुसऱ्या डावात आज दिवसअखेर ४ बाद १४७ धावा करत, मुंबईवर २६० धावांची आघाडी घेतली.

मुंबईचा पहिला डाव आज २७० धावांवर आटोपला. आकाश आनंदनं शतक झळकावत १०६ धावा केल्या. विदर्भातर्फे पार्थ रेखाडेनं ४ बळी घेतले. दुसऱ्या डावात, विदर्भाची सुरुवात खराब झाली. त्यांचे ४ गडी झटपट बाद झाले. मात्र त्यानंतर यश राठोड आणि कर्णधार अक्षय वाडकर यांनी डाव सावरला. आजचा खेळ थांबला तेव्हा यश राठोड ५९, तर अक्षय वाडकर ३१ धावांवर खेळत होता.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**